व्यंकटेशच्या कु. अथर्व पाटील ची चेन्नई येथे होणाऱ्या आंतर - विद्यापीठीय जलतरण स्पर्धेसाठी निवड



"व्यंकटेश महाविद्यालयाने आजपर्यंत अविरत विद्यार्थी घडवण्याचे काम केले असून अनेक विद्यार्थ्यानी शैक्षणिक क्षेत्रामधून मोठमोठ्या नोकरीच्या संधी प्राप्त केल्या आहेत, त्याचबरोबर क्रीडा स्पर्धामध्ये देखील व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटविला आहे. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील परस्पर सहकार्य व ना. बा. एज्युकेशन संस्थेची नेहमीच पाठीशी असणारी साथ यामुळे विविध क्रीडा क्षेत्रांमध्ये विद्यार्थी आपली उल्लेखनीय कामगिरी करत आहेत." असे प्रतिपादन ना. बा. एज्युकेशन संस्थेचे चेअरमन श्री. कृष्णा बोहरा यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर-विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमप्रसंगी बोलत होते. महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी प्रयत्न करीत असते व विद्यार्थ्यांना करिअर विषयी मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहन देत असते, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी आपल्या मनोगतामध्ये केले. अशीच मोठ मोठी यशाची शिखरे पदापर्यंत करीत राहा महाविद्यालयातर्फे आवश्यक ती मदत नेहमी खेळाडूंसाठी केली जाते व केली जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. शिवाजी विद्यापीठ अंतर-विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये कुमार अथर्व पाटील १०० मी. फ्रीस्टाइल स्पर्धेमध्ये व ५० मी. फ्रीस्टाइल स्पर्धेमध्ये अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला तसेच चेन्नई येथे पश्चिम-विभागीय अंतर-विद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात त्याची निवड झाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन, महाविद्यालयाचे प्राचार्य व क्रीडा विभागप्रमुख श्री. ए. आय. बाणदार यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वेश गुरव १०० मी. बटरफ्लाय व २०० मी. बटरफ्लाय स्पर्धेमध्ये अनुक्रमे तृतीय व द्वितीय क्रमांक पटकावला व ४x१०० मिडले रिले स्पर्धेमध्ये कू.अथर्व पाटील, कू. सर्वेश गुरव, कू. मानस चाळके व कू. रुद्राक्ष वरदायी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने व क्रीडा विभागप्रमुख श्री. ए. आय. बाणदार यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सत्कार प्रसंगी ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर व सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. बी. मलघाण उपस्थित होते.